२. वरील वित्तीय वर्षामध्ये सर्व प्रभागांचे एकत्रित करुन बेरजा गोषवारे नमूद केले नाहीत व वार्षिक गोषवाऱ्यावर तसेच मागणी नोंदवही व कर निर्धारण नोंदवहीवर प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्याचे दिसून आले नाही.
३. थकबाकीधारकांची नोंदवही ठेवल्याचे लेखापरिक्षणास दिसून आले नाही ह्याबाबत सुस्पष्ट खुलासा करावा.
वरील १ ते ३ बाबींची पूर्तता करुन लेखापरिक्षणास अनुपालन सादर करावे.

वसूल पात्र रक्कम रुपये २४०८३७५२०/-

२४. **मालमत्ता कर विभागातील संगणकीय प्रणालीद्वारे रोख व धनादेशाच्या वसुली पावत्यांवर मुद्रांकीत अनुक्रमांक नसल्याबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाचे रोख व धनादेशाच्या पावत्यांचे पोटकीर्दीसोबत पडताळणी करीत असता खालील अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

१. नालासोपारा विभागीय कार्यालयाने मालमत्ता कर रोख व धनादेशाद्वारे वसुल करण्यासाठी संगणकीय पावत्यांचा वापर केला आहे. परंतु सदरच्या संगणकीय पावत्यांवर मुद्रांकीत अनुक्रमांक दिले नाहीत. वरील कालावधीत एकूण किती संगणकीय पावत्या छपाई करुन घेतल्या व त्यापैकी वापरासाठी किती घेतल्या त्याचा हिशोब ठेवलेला नाही.
२. सदरची बाब गंभीर असून संपूर्ण कालावधीत एकही संगणकीय पावती रद्द केलेली आढळून आली नाही.
तरी याबाबत कोणतीही अनियमितता झाली नसल्याची खात्री करावी व याबाबतीत लेखापरीक्षणास योग्य तो खुलासा करावा.

२५. **नियमाप्रमाणे नोंदवह्या न ठेवलेबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयातील सन २०११-१२ या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणात खालील नोंदवह्या लेखापरिक्षणास सादर केल्या नाहीत.

१. नमुना नं.४४ मुल्य निर्धारण कर व आकारणी याबाबतची आक्षेप नोंदवही
२. नमुना नं.४६ वाढ व घट नोंद वही
३. नमुना नं.५१ मधील नोटीस व वॉरंट फी नोंदवही महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता अधिनियम १९७१ चे नियम ७५(५) (७) अन्वये वरील नोंदवह्या अद्ययावत करुन ठेवणे आवश्यक आहे. तथापि कर विभागाने सदरच्या नोंदवह्या ठेवल्या नाहीत. याबाबत संबंधित विभागाने नोंदवह्या तयार करुन संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन लेखापरिक्षणास अनुपालन सादर करावे.

२६. **धनादेश रद्द झालेबाबत**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयातील सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण केले असता **परिशिष्ट क्र.३ (पृष्ठ क्र.१३८ ते १४३)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे मालमत्ताधारकांनी कराच्या स्वरुपात धनादेश दिले होते. सदर मालमत्ता कराचे धनादेश बँकेकडून विविध कारणे नमूद करुन परत आल्यामुळे संबंधित मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराची रक्कम दंडासहीत महानगरपालिका निधीमध्ये जमा करावयाची आहे. परंतु परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे रक्कम रु.२४५५३२३/- धनादेशाची रक्कम महानगरपालिका निधीमध्ये जमा केल्याचे दिसून येत नाही. करिता संबंधीत मालमत्ताधारकांकडून वरील रकमेची व्याजासहित वसुली करुन महानगरपालिका फंडात जमा करुन तसा अहवाल लेखापरिक्षणास सादर करावा.

वसूल पात्र रक्कम रुपये २४५५३२३/-

२७. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाक्या पुढील वर्षाच्या मागणी नोंदवहीत न ओढल्याबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाच्या मागणी नोंदवहीचे लेख्यांची तपासणी केली असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिंता १९७१ मधील नियम ७६ (२) मध्ये नमुद केल्यानुसार सन २०१०-११ अखेरच्या थकबाक्या सन २०११-१२ च्या मागणी नोंदवहीत कमी/जादा ओढल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. सोबत **परिशिष्ट क्र.४ (पृष्ठ क्र.१४३ ते १४४)** जोडले आहे. जादा ओढलेली रक्कम रु.६१४५९/- इतकी असून कमी ओढलेली रक्कम रु.२०५९४/- इतकी आहे. सदरची सन २०१०-११ अखेरची थकबाकीची रक्कम कमी ओढल्याने ती कायम स्वरुपी लेख्यातून बाहेर जाण्याची शक्यता आहे. तेव्हा सदर सन २०१०-११ अखेरच्या थकबाकीच्या रक्कमा मागणी नोंदवहीत न ओढल्याबाबत खुलासा करुन त्या रकमा खातेदाराच्या मागणी नोंदवहीत नोंदी दाखवून त्यांच्याकडून वसूलीची कार्यवाही करावी. उपरोक्त अनियमितता उदाहरणे दाखल देण्यात आले असून त्याचा तपशिल सोबत जोडलेल्या विवरणपत्रकात देण्यात आलेला आहे. उर्वरीत मागणी नोंदवहीतील थकबाकी धारकाच्या थकबाक्या पुढील वर्षात ओढल्या किंवा कसे याबाबतची खात्री करुन मेळ घेण्यात यावा. तसेच या वर्षाची व मागील वर्षाची मागणी नोंदवही यातून मागणी विषयक नोंदी अचूकपणे पुढे ओढण्यात आल्या आहेत का ? याबाबत खात्रीकरुन तत्कालीन सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने तसे प्रमाणित करणे आवश्यक असताना मागणी नोंदवही प्रमाणित केली नसल्याचे आढळून आले आहे. तरी या बाबत खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रु. ६१४५९/-

२८. **एकत्रित कराची मागणी व कर निर्धारण सूचीच्या मागणी मध्ये असलेल्या तफावतीबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागातील कर विभागाच्या मागणी नोंदवहीचे लेख्यांची तपासणी केली असता **परिशिष्ट क्र.५ (पृष्ठ क्र.१४४ ते १४८)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिंता १९७१ मधील नियम ७५ व ७६ च्या १ ते ४ अन्वये कर निर्धारण सुचीमध्ये दर्शविलेली मागणी रक्कम मागणी नोंदवहीमध्ये कमी/जादा ओढल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. कमी ओढलेली रक्कम रु.६०१३/- इतकी असून जादा ओढलेली रक्कम रु.१४७४४३/- इतकी आहे. तरी सदरची कमी ओढलेली रक्कम खातेदारांकडून वसूल करुन महापालिकेच्या निधीत जमा करुन तसेच कर निर्धारण सूची व एकत्रित मालमत्ता कराची मागणी यांचा ताळमेळ घेऊन कराच्या योग्य नोंदी अचूकपणे ओढून याबाबत कर निर्धारण सूची व मागणी नोंदवही सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घ्यावे व लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रु. ६०१३/-

२९. **नवीन कर आकारणीबाबत – तफावत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील नवीन कर आकारणी बाबतच्या नस्तींचे लेखापरिक्षण करीत असता **परिशिष्ट क्र.६ (पृष्ठ क्र.१४८ ते १५६)** मध्ये दर्शविल्यानुसार खालीलप्रमाणे अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

१. अनु क्र.१ ते २ मध्ये दर्शविलेल्या इमारतीमध्ये पाच मजली सदनिका बांधण्यात आल्या आहेत. परंतु प्रत्यक्षामध्ये नियोजन प्राधिकरणाने चार मजली सदनिकांनाच परवानगी दिलेली आहे. कर निर्धारण नोंदवही नमुना नं.४३ मध्ये पाच मजल्यापर्यंत असलेल्या सदनिकांना अधिकृत कर आकारणी केलेली आहे. प्रत्यक्षामध्ये पाचवा मजला हा अनधिकृत असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या नियम २६७ (अ) नुसार शास्तीसह आकारणी करणे आवश्यक आहे.

२. अनु क्र.३ ते ४ मध्ये दर्शविलेल्या इमारतीमध्ये तीन मजली सदनिका बांधण्यात आल्या आहेत. परंतु प्रत्यक्षामध्ये नियोजन प्राधिकरणाने दोन मजली सदनिकांनाच परवानगी दिलेली आहे. कर निर्धारण नोंदवही नमुना नं.४३ मध्ये तीन मजल्यापर्यंत असलेल्या सदनिकांना अधिकृत कर आकारणी केलेली आहे. प्रत्यक्षामध्ये तिसरा मजला हा अनधिकृत असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या नियम २६७ (अ) नुसार शास्तीसह आकारणी करणे आवश्यक आहे.

३. अनु. क्र.५ ते २४६ मध्ये दर्शविलेल्या मालमत्तांना मंजूर नस्तीप्रमाणे मागील वर्षांपासून आकारणी करणे आवश्यक होते. परंतु कर निर्धारण नोंदवहीमध्ये सदर मालमत्तांची आकारणी चालू वित्तीय वर्षापासून करण्यात आली आहे.

४. अनु.क्र.२४७ ते ३६३ मध्ये दर्शविलेल्या मालमत्तांना मंजूर नस्तीप्रमाणे शास्तीसह आकारणी करणे आवश्यक होते. परंतु कर निर्धारण नोंदवही नमुना नं.४३ मध्ये सदर मालमत्तांना अधिकृत कर आकारणी करणेत आली आहे.

५. अनु.३६४ मध्ये दर्शविलेल्या सदनिकेची आकारणी ३९० चौ.फू. प्रमाणे करावयाची होती. परंतु कर निर्धारण नोंदवही नमुना नं.४३ मध्ये सदर सदनिकेची कर आकारणी ३१० चौ.फू. प्रमाणे करण्यात आली आहे.

उपरोक्त १ ते ५ मध्ये दर्शविलेल्या बाबींमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन लेखापरिक्षणास अनुपालन सादर करावे.

वसुलपात्र रक्कम रु.१०७३१९५/-

३०. **मालमत्ता कर आकारणी करताना वाणिज्य दराने आकारणी न करता रहिवाशी दराने मालमत्ता कर वसुल केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयातील सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील नवीन कर आकारणी नस्तींचे लेखापरिक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आली आहे.

१. **परिशिष्ट क्र.७ (पृष्ठ क्र.१५६)** मध्ये दर्शविलेल्या नवीन मालमत्ता कर आकारणी करताना नस्तीसोबत सादर केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबतच्या प्रतिज्ञापत्रामध्ये सदर मालमत्तेचा वापर वाणिज्यकरिता करत आहे, असा उल्लेख केला असतांनासुध्दा सदर मालमत्तेची कर आकारणी करतेवेळी वाणिज्य दराने आकारणी न करता रहिवाशी दराने आकारणी करुन मालमत्ता कर वसुली केल्यामुळे रक्कम रु.८३४१/- मात्र चे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. करिता सदरची मालमत्ता कर रक्कम रु.८३४१/- संबंधित मालमत्ताधारकाकडून वसुल करुन महानगरपालिका निधीत जमा केल्याचे लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रु.८३४१/-

३१. **नवीन कर आकारणी बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर विभागातील नविन कर आकारणी नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमीतता झाल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे.

१. **परिशिष्ट क्र.८ (पृष्ठ क्र.१५६ ते १५८)** मधील सादर केलेल्या मालमत्ता क्रमांकानूसार मालमत्ताधारकास नविन कर आकारणी करते वेळी मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या २६७ (अ) नुसार कार्यवाही केल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. करिता संबंधित नविन कर आकारणीच्या नस्तीमध्ये कर आकारणी करताना लिपीक (निरीक्षक) यांनी प्रत्यक्ष जागेवर भेट देऊन मोजमापे घेऊन कर आकारणी आवश्यक असताना तसा अहवाल घेतल्याचे नस्तीमध्ये आढळून आले नाही.

परिशिष्ट क्र.८ (पृष्ठ क्र.१५६ ते १५८) मध्ये सादर केलेल्या नवीन कर आकारणी नस्तीच्या प्रस्तावावर मा. आयुक्त/उपायुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांची मंजुरी घेणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात संबंधित अधिकाऱ्याने मा.आयुक्त/उपायुक्त यांची मंजुरी/स्वाक्षरी न घेता स्वतःच्या अधिकारात नवीन कर आकारणीची नोंद मागणी नोंदवहीत केली आहे. ही बाब प्रशासकीय दृष्टीने गंभीर स्वरुपाची आहे. करिता संबंधिताने मा. आयुक्त/उपायुक्त यांची मंजुरी न घेता कर आकारणी कोणत्या नियमानुसार केली याचा साधार खुलासा करावा. तसेच संबंधिताने सदर नस्तीवर मा.आयुक्त/उपायुक्त यांची मंजुरी घेऊन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

३२. **मालमत्ता हस्तांतरणाबाबत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागातील कर निर्धारण नोंदवही नमुना नं.४३ व मागणी नोंदवही नमुना नं.४७ मध्ये मिळकतीच्या मालकीच्या हस्तांतरण केलेल्या नस्तीचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता झाल्याचे दिसून येते.

१. **परिशिष्ट क्र.९ (पृष्ठ क्र.१५८ ते १६१)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे मालमत्ताधारकाच्या नावांत किंवा मालमत्ता हस्तांतरण करतेवेळी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची "ड" नुसार प्रकरण ८ नियम २० अन्वये नियम ४६९ अन्वये सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्यांची मंजूरी घेऊन मालमत्ता हस्तांतरण केले आहे. परंतु मालमत्ता हस्तांतरण करतेवेळी नस्तीसोबत नोंदणीकृत करारनामा सादर केलेला नाही.

२. संबंधीत मालमत्ताधारक मयत असल्यास सदर मालमत्ता वारसाच्या नावावर हस्तांतरण करतेवेळी मृत्युच्या दाखल्याच्या नोंदीची सांक्षांकित केलेली प्रत सादर न केल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे.

३. तसेच अनुक्रमांक १ ते १०५ मध्ये शेरा कॉलममध्ये दर्शविलेल्या अपूर्ण कागदपत्रांची पूर्तता न करता मालमत्ता हस्तांतरण कोणत्या नियमानुसार केली याचा साधार खुलासा करावा.

वरील १ ते ३ बाबींमध्ये दर्शविलेल्या नोंदींची पूर्तता करुन संबंधीत प्राधिकृत अधिकाऱ्याची मंजुरी घेऊन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

३३. **अनधिकृत बांधकामावर नव्याने केलेल्या कर आकारणी बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील अनधिकृत बांधकामांवर कर आकारणी केलेल्या प्रकरणांच्या नस्त्यांचे लेखा परिक्षण केले असता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या २६७(अ) नुसार कार्यवाही केल्याचे दिसून येते. परंतु **परिशिष्ट क्र.१० (पृष्ठ क्र.१६१ ते १६३)** मध्ये दर्शविल्यानुसार अनधिकृत बांधकामांवर कर आकारणी करते वेळी अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे. अर्जदाराने कर आकारणीचा अर्ज केल्यानंतर त्या अर्जाची नोंद आवक बारनिशी मध्ये झाली पाहिजे व त्या आकारणी अर्जावरुन सदर आवक बारनिशी मधील अनुक्रमांक व दिनांक त्या अर्जावर महानगरपालिकेचा शिक्का उमटवून त्यावर संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी झाली पाहिजे. अशा अर्जदाराने नवीन कर आकारणीचा अर्ज

सादर केल्यानंतर त्यासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे / दस्तऐवज लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. संबंधित आकारणीसाठी मोजमापे घेतल्याचा उल्लेख नाही. सोबत नकाशा जोडलेला नाही. सातबारा उतारा जोडलेला नाही. अर्जदाराने १००/- रु.च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र (नोटरीच्या सहीसह) सादर केले नाही. जागेचा मूळ मालक कोण हे दर्शविणारे कागदपत्रं अर्जासोबत जोडलेले नाहीत. सक्षम प्राधिकाऱ्याने अशा कराच्या आकारणीस मंजूरी दिल्यानंतर कर निर्धारण नोंदवहीतील शेरा रकान्यात मंजूरीचा क्रमांक आणि दिनांक नमूद केलेला नाही. एकंदरीत अनधिकृत बांधकाम असलेल्या इमारती/घरावर आकारणी करताना आवश्यक ती काळजी घेतलेली नाही. त्यामुळे मागील बऱ्याच वर्षांपासून वसुलीयोग्य असलेल्या मालमत्तांवर कराची आकारणी न केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. याबाबत संबंधितांनी लेखापरिक्षणास खुलासा करावा.

३४. **एकत्रित मालमत्ता कराची पोटकिर्द व पावती पुस्तक यामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागातील एकत्रित मालमत्ता कराची पोटकिर्द व पावती पुस्तके यांचा परस्परांशी मेळ घेऊन लेखापरिक्षण केले असता **परिशिष्ट क्र.११ (पृष्ठ क्र.१६३)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे पोटकिर्दीमधील रक्कम रु.७०६५/- रकमेची नोंद असलेल्या दुय्यम पावत्या पावती पुस्तकात उपलब्ध झाल्या नाहीत. सदर पावत्या उपलब्ध न झाल्याने सदर पावत्यांद्वारे अपहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत स्वयंस्पष्ट खुलासा लेखापरिक्षणास सादर करावा व सदर अनुपलब्ध पावत्या उपलब्ध करुन देऊन लेखापरिक्षणास अनुपालन सादर करावे.

३५. **मालमत्ता हस्तांतरण करणे कामी जाहिरातीवर केलेल्या खर्चाबाबत**

वसई-विरार शहर महानगरपालिका नालासोपारा विभागीय कार्यालयातील सन २०११-१२ मधील मालमत्ता कर विभागाच्या नस्तीची पडताळणी केली असता खालील अनियमितता/त्रुटी लेखापरिक्षणात दिसून येत आहेत.

नालासोपारा क्षेत्रिय कार्यालयाकडून मालमत्ता हस्तांतरण करणे कामी आपले क्षेत्रातील नागरिकांना जाहीर सुचना दिली जाते आणि संबंधित हस्तांतरण करणारे करदाते व खरेदीदार ह्यांची नावे जाहिर नोटीशीद्वारे प्रसिध्द केली जातात. त्यामुळे सहाजिकच जाहिरातीचा खर्च महानगरपालिकेला करावा लागतो. प्रत्यक्षात खरेदीदार व विक्रेते यांचे हित पाहण्याचे काम महानगरपालिकेचे नसून संबंधीत व्यवहार करणाऱ्यांचे आहे. त्यामुळे अशाप्रकारची जाहिरात देऊन जाहिरातींचा भुर्दंड महानगरपालिकेला सोसावा लागला आहे.

ह्याबाबत चौकशी करता नालासोपारा क्षेत्रिय कार्यालयातील संबंधितांनी दिलेल्या माहितीनुसार हस्तांतरण फी वसुल करताना जाहिरातीचा खर्च वसुल केला जातो. परंतु अशा किती लोकांनी हस्तांतरण फी भरली, किती लोकांकडून जाहिरात खर्च वसूल केला ह्याबाबतची आवश्यक ती नोंद ठेवण्यात आली नाही. त्यामुळे खर्चाची पडताळणी करता आली नाही.

सन २०११-१२ ह्या वित्तीय वर्षामध्ये किती जाहिराती दिल्या व त्यावर किती खर्च करण्यात आला आणि त्यापैकी किती रक्कम वसूल करण्यात आली ह्याचा हिशोब लेखापरिक्षणास दाखवावा अन्यथा जाहिरातीसाठी केलेल्या खर्चाची रक्कम संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन वसूल करण्याची कार्यवाही करुन लेखापरिक्षणास अनुपालन सादर करावे.

३६. **पाणीपट्टी कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील पाणीपुरवठाविभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.१२ (पृष्ठ क्र.१६४)** मध्ये दर्शविलेल्या पाणीपट्टी कर थकबाकी एकूण रक्कम रुपये ३००१०११९/- थकीत आहे.

मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापी त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम रुपये ३००१०११९/- व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर पाणीपट्टी कर थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच पाणीपट्टी कर थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही? याबाबत खुलासा करावा करीता सदर थकबाकी वसूली बाबत ठोस कार्यवाही करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रु.३००१०११९/-

३७. **पाणीपुरवठा विभागातील संगणकीय प्रणालीद्वारे रोख व धनादेशाच्या वसुली पावत्यांवर मुद्रांकीत अनुक्रमांक नसल्याबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील पाणीपुरवठा विभागाचे रोख व धनादेशाच्या पावत्यांचे पोटकीर्दीसोबत पडताळणी करीत असता खालील अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

१. नालासोपारा विभागीय कार्यालयाने पाणीपट्टी कर रोख व धनादेशाद्वारे वसुल करण्यासाठी संगणकीय पावत्यांचा वापर केला आहे. परंतु सदरच्या संगणकीय पावत्यांवर मुद्रांकीत अनुक्रमांक दिले नाहीत. वरील कालावधीत एकूण किती संगणकीय पावत्या छपाई करुन घेतल्या व त्यापैकी वापरासाठी किती घेतल्या त्याचा हिशोब ठेवलेला नाही.
२. सदरची बाब गंभीर असून संपूर्ण कालावधीत एकही संगणकीय पावती रद्द केलेली आढळून आली नाही.

तरी याबाबत कोणतीही अनियमितता झाली नसल्याची खात्री करावी व याबाबतीत लेखापरीक्षणास योग्य तो खुलासा करावा.

३८. <u>जाहिरात करा बाबत</u>

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयातील सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील जाहिरात कराच्या नोंदवहीचे लेखा परीक्षण केले असता खालील अनियमितता झाल्याचे दिसून येते.

१. **परिशिष्ट क्र.१३ (पृष्ठ क्र.१६४)** मध्ये दर्शविलेली रक्कम रुपये १०२०५९/- थकीत असल्याचे आढळून आले आहे. करिता सदरची थकीत रक्कम रु. १०२०५९/- मात्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची प्रकरण ८ मधील नियम क्रमांक ४२ अन्वये व्याजासह वसूल करुन महानगरपालिका निधीत जमा केल्याचे लेखापरिक्षणास दाखवावे.

२. सन २०१०-११ या वित्तीय वर्षातील मागणी नोंदवहीवरुन सन २०११-१२ च्या जाहिरात कराच्या थकीत रकमा नोंदवहीत ओढल्या आहेत की नाहीत याची खात्री करण्यासाठी सन २०१०-११च्या मागणी नोंदवहीची मागणी करुनही नोंदवही उपलब्ध झाली नाही. त्यामुळे वित्तीय वर्षात एकूण मागील रकमेची थकबाकी किती आहे याची लेखापरिक्षणास पडताळणी करता आली नाही. त्यामुळे त्या वित्तीय वर्षामध्ये जमा झालेल्या रकमांचा मेळ घेता आला नाही.

३. सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील मागणी नोंदवहीवर वार्षिक गोषवारा काढल्याचे दिसून आले नाही. तसेच त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेण्यात आली नाही.

४. विभागीय कार्यालय हद्दितील जाहिरातीं बाबत नव्याने सर्वेक्षण करुन जाहिरातीवरील कराचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक) नियम २००३ अन्वये कार्यवाही करण्यात आली नाही.

वरील १ ते ४ बाबींची पूर्तता करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रु. १०२०५९/-

३९. <u>परवाना फी बाबत</u>

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील व्यावसायिकांना परवाना दिल्याच्या नोंदवहीचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.१४ (पृष्ठ क्र.१६४)** मध्ये दर्शविलेल्या परवाना फी थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये १२००/- थकीत आहे.

मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापी त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम रुपये १२००/- व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर परवाना फी थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच परवाना फी थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही? याबाबत खुलासा करावा करीता सदर थकबाकी वसूली बाबत ठोस कार्यवाही करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये १२००/-

४०. <u>फेरीवाला परवाना नुतनीकरण बाबत</u>

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय हद्दित व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांना दिलेल्या ना-हरकत दाखल्याचे मुदतीनंतर नुतनीकरण करणे आवश्यक आहे. नालासोपारा विभागामार्फत ज्या व्यावसायिकांना अशा स्वरुपाचे ना-हरकत दाखले देण्यात आले आहेत. त्यांची वर्ष निहाय नोंदवही ठेवून त्यांचे नूतनीकरण दिनांक कोणत्या तारखेस आहे, तसेच सदर व्यावसायिकांनी प्रमाणपत्र नुतनीकरण केले किंवा नाही, याबाबत विभागामार्फत लक्ष ठेवणे आवश्यक आहे. तसेच व्यावसायिकांना विहीत वेळेत नुतनीकरण संदर्भात आधीच कळविणे आवश्यक आहे.

लेखे तपासले असता **परिशिष्ट क्र.१५ (पृष्ठ क्र.१६४)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे सामान्य प्रशासन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या परवाना नुतनीकरणावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण ठेवल्याचे दिसून येत नाही. तसेच किती व्यावसायिकांनी परवाने नुतनीकरण केले याबाबतच्या नोंदी ठेवल्या नाहीत. तसेच परवाने नुतनीकरण करणेबाबत प्रशासनाने व्यावसायिकांना का कळविले नाही व त्यांचे कडून शुल्क का वसूल केले नाही? याबाबतचा खुलासा लेखापरिक्षणास करावा.

४१. <u>वाहन व दिवाबत्ती विभागातील नोंदवहीबाबत</u>

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सन २०११-१२ या वित्तीय वर्षाच्या वाहन व दिवाबत्ती विभागातील पेट्रोल हिशोब नोंदवही नमुना नं.१२६ व विद्युत प्रकाश दिव्यांचा हिशोब नमुना क्र.११६ नोंदवहीचे लेखापरिक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

१. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम क्र.१५३ अन्वये वाहन विभागातील पेट्रोल हिशोब नोंदवही नमुना क्र.१२६ प्रमाणे पेट्रोल चा हिशोब नोंदवहीत ठेवला आहे. तसेच विद्युत प्रकाश दिव्यांचा हिशोब नमुना क्र.११६ हिशोब नोंदवहीत ठेवला आहे. सदर हिशोब नोंदवहीवर प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी न घेतल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे.

२. मोटार वाहन व मोटार वाहनाचे हिशोब नमुना नं.१२७ प्रमाणे नोंदवही ठेवली आहे. सदर नोंदवहीवर प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी न घेतल्याचे आढळून आले आहे. तरी याबाबत लेखापरिक्षणास पुर्तता अहवाल द्यावा.

४२. **आरोग्य विभागातील नोंदवहीबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सन २०११-१२ या वित्तीय वर्षाच्या आरोग्य विभागातील नोंदवहीची लेखापरिक्षणात खालील अनियमितता आढळून आली आहे.

औषधे व जंतुनाशके ह्यांची नोंद नमुना नं.११६ नोंदवहीत ठेवली आहे. सदर नोंदवही मध्ये सन २०११-१२ मध्ये एकूण औषधे किती पुरवठा केली व त्यापैकी किती शिल्लक राहिली यांचे गोषवारे काढले नाहीत. सदर गोषवारे काढून संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेऊन लेखापरिक्षणास पूर्तता दाखवावी.

४३. **भविष्य निर्वाह निधीचे लेखे अद्ययावत न ठेवलेबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या कालावधीच्या लेखापरिक्षणा दरम्यान कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधिंचे लेखे महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम १३४ चे (१)(३)(५) नुसार नमुना क्र ९८ मध्ये भविष्य निर्वाह निधीची नोंदवही तसेच नियम १३४ च्या (३) नुसार नमुना क्र.९९ मध्ये भविष्य निर्वाह निधी बृहत्तपत्रक नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तसेच भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीद्वारे जमा होणारी सर्व रक्कम व त्यावर मिळणाऱ्या व्याजाची रक्कमेच्या नोंदी प्रत्येक वर्षी कर्मचाऱ्यांना नमुन्यामध्ये मिळणे क्रमप्राप्त आहे.

परंतु नालासोपारा विभागीय कार्यालयाच्या भविष्य निर्वाह निधीचे लेख्यांचे लेखापरिक्षण करीत असता कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा होणारी रक्कम नमुना क्र.९८ मध्ये जमा केल्याचे दिसून येते. सन २००९-१० या वित्तीय वर्षापासून ते सन २०११-१२ या वित्तीय वर्षापर्यंत व्याजाची परिगणना न केल्याचे आढळून आले आहे. करिता सन २००९-१० या वित्तीय वर्षामध्ये ८ टक्के, सन २०१०-११ मध्ये ८ टक्के, सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये एप्रिल २०११ ते नोव्हेंबर २०११ या कालावधीकरिता ८ टक्के व डिसेंबर २०११ ते मार्च २०१२ पर्यंत ८.६ टक्के प्रमाणे व्याजाची परिगणना नमुना क्र.९८ मध्ये करुन प्रत्येक कर्मचाऱ्यास सन २००९-१० या वित्तीय वर्षापासून ते सन २०११-१२ पर्यंत एकूण भविष्य निर्वाह निधी किती जमा झाला व त्यावर व्याज किती जमा झाले याचे बृहतपत्रक तयार करुन कर्मचाऱ्यांना देऊन कर्मचाऱ्यांची पोहोचपावती घेऊन लेखापरिक्षणास अनुपालन सादर करावे.

४४. **वेतनातून कपात केलेला व्यवसाय कर शासकीय कोषागारात जमा न केले बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील लेखा विभागातील रोकडवहीचे लेखापरिक्षण केले असता **परिशिष्ट क्र.१६ (पृष्ठ क्र.१६४ ते १६५)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे रोकडवहीमध्ये वेतनातून कपात केलेला व्यवसाय कर शासकीय कोषागारात जमा न केल्याचे आढळून आले आहे. करिता सदरचा व्यवसाय कर शासकीय कोषागारात जमा व प्रमाणित केल्याचे लेखा परीक्षणास पूर्तता दर्शवावी.

४५. **वेतनातून कपात केलेला भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये भरणा न केले बाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील लेखा विभागातील रोकडवहीचे लेखापरिक्षण केले असता **परिशिष्ट क्र.१७ (पृष्ठ क्र.१६५)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे रोकडवहीमध्ये वेतनातून कपात केलेला भविष्य निर्वाह निधीच्या रकमा खात्यामध्ये जमा न केल्याचे आढळून आले आहे. करिता सदरच्या रकमा भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करावी. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ च्या नियम क्र.१३४ च्या (१) (२) (३) (४) (५) (६) अन्वये पूर्तता करुन लेखा परीक्षणास अनुपालन दाखवावे.

४६. **जंगम मालमत्ता नोंदवही (नमुना नं.११४) बाबत**

वसई-विरार शहर महानगरपालिका नालासोपारा विभागीय कार्यालयातीचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील भांडार विभागाच्या नोंदवह्यांचे लेखापरिक्षण करीत असतांना खालील प्रमाणे अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे. याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

नालासोपारा विभागीय कार्यालयातील भांडार विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ च्या नियम क्र.१४४(१) (२) अन्वये नमुना क्र.११४ जंगम मालमत्ता नोंदवहीमध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या इंजिने, यंत्रे, साधने, वाहने, जलसिंचनाच्या गाड्या, दिवे, दिव्यांचे खांब, फर्निचर इत्यादी ह्यांची नोंद नोंदवहीत घेऊन प्राधिकृत अधिकाऱ्यांची स्वाक्षरीनिशी नमुद केली पाहिजे. परंतु भांडार विभागाने सदरची नोंदवही महानगरपालिका स्थापनेपासून अद्ययावत न केल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. तरी सदरची नोंदवही अद्ययावत करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

४७. **भंगार अनुपयुक्त मालाची विक्री करणे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सन २०११-१२ या वित्तीय कालावधीतील पाणीपुरवठा विभाग, विद्युत विभाग, आरोग्य विभाग, इत्यादी विभागासाठी नवीन साहित्य/माल खरेदी केले आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

१) पाणीपुरवठा विभाग, विद्युत विभाग, आरोग्य विभाग इत्यादी विभागांनी नविन साहित्य खरेदी करुन ते वापरण्यात आले आहे. परंतु नविन साहित्य ज्या ज्या ठिकाणी वापरले तेथील जुने साहित्य संग्रह खाते नोंदवहीत नोंदविलेले नाही. (म.न.प.ले.सं.१९७१ नि.क्र१९६ परिशिष्ठ दोन नि.क्र १९६ परिशिष्ट दोन नि.क्र ३७ (३))

२) उपरोक्त परिशिष्ठ दोन नि.क्र ४०(१) नुसार प्रत्येक वर्षी सप्टेंबर व मार्च अखेर शिल्लक मालाच्या यादया तयार करुन भंगार नसलेल्या मालाची विल्हेवाट लावावयाची कार्यवाही करावयाची असताना ती केलेली नाही.

३) म.न.प.ले.सं १९७१ मधील नि क्र १५६ नुसार संग्रहपुस्तकात जंगम मालमतेचे पुस्तक व स्थावर मालमत्तेचे पुस्तक यात नोदलेली सर्व स्थावर व जंगम मालमत्त याची वार्षिक परि. दोन नि.क्र .४३(२)नुसार एप्रिल महिना अखेर पूर्वी पडताळणी करावयाची असताना ती केलेली नाही .

४) अनुपयुक्त/भंगार मालाची विल्हेवाट लावण्यास होणारा विलंब मुल्ये-हासास कारणीभूत होत असताना व साठवणीचा अनावश्यक खर्च करणे भाग पडत असताना लेखापरिक्षणाच्या काळावधीपर्यंत भंगार /अनुपयुक्त मालाची नियमानुसार लिलावाद्वारे विक्री न केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता टाळता येत नाही. खुलासा करावा.

४८. **श्री. राजेंद्र शिवनारायण जाधव यांच्या वेतनवाढीबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील आस्थापना विभागातील सेवा पुस्तकांची तपासणी करीत असता **परिशिष्ट क्र.१८ (पृष्ठ क्र.१६६)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे सन २०११-१२ वित्तीय वर्षामध्ये माहे जुलै २०११ मध्ये दिलेली वेतनवाढ सन जुलै २०१२ मध्ये पूर्ण होऊन जुलै २०१२ मध्ये सदर वेतनश्रेणीवर परिगणना होऊन वेतनवाढ होणे आवश्यक होते. परंतु सन २०११ मध्ये दिलेलीच वेतनवाढ कायम ठेऊन दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. त्यामुळे परिशिष्टामध्ये दर्शविलेले कर्मचारी श्री. राजेंद्र शिवनारायण जाधव यांस माहे जुलै २०१२ ते माहे फेब्रुवारी २०१३ पर्यंतची रक्कम रु.३५६८/- कमी वेतन दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. तरी या बाबत संबंधीत कर्मचाऱ्यास सदरची रक्कम अदा करण्यात यावी व अशी चूक पुन्हा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतनवाढ नोंदवही अद्ययावत करुन त्यावर मंजुरीचे आदेश घेण्यात यावेत व वरील सर्व बाबींची पूर्तता करुन तसे अनुपालन लेखापरिक्षणास सादर करावे.

४९. **श्रीम. सुगंधा सदानंद भुजारे यांच्या वेतनवाढीबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील आस्थापना विभागातील सेवा पुस्तकांची तपासणी करीत असता **परिशिष्ट क्र.१९ (पृष्ठ क्र.१६६)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे सन २०११-१२ वित्तीय वर्षामध्ये माहे जुलै २०११ मध्ये दिलेली वेतनवाढ सन जुलै २०१२ मध्ये पूर्ण होऊन जुलै २०१२ मध्ये सदर वेतनश्रेणीवर परिगणना होऊन वेतनवाढ होणे आवश्यक होते. परंतु सन २०११ मध्ये दिलेलीच वेतनवाढ कायम ठेऊन दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. त्यामुळे परिशिष्टामध्ये दर्शविलेले कर्मचारी श्रीम. सुगंधा सदानंद भुजारे यांस माहे जुलै २०१२ ते माहे फेब्रुवारी २०१३ पर्यंतची रक्कम रु.२५७०/- कमी वेतन दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. तरी या बाबत संबंधीत कर्मचाऱ्यास सदरची रक्कम अदा करण्यात यावी व अशी चूक पुन्हा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतनवाढ नोंदवही अद्ययावत करुन त्यावर मंजुरीचे आदेश घेण्यात यावेत व वरील सर्व बाबींची पूर्तता करुन तसे अनुपालन लेखापरिक्षणास सादर करावे.

५०. **श्रीम. रेखा राजू घोरी यांच्या वेतनवाढीबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील आस्थापना विभागातील सेवा पुस्तकांची तपासणी करीत असता **परिशिष्ट क्र.२० (पृष्ठ क्र.१६७)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे सन २०११-१२ वित्तीय वर्षामध्ये माहे जुलै २०११ मध्ये दिलेली वेतनवाढ सन जुलै २०१२ मध्ये पूर्ण होऊन जुलै २०१२ मध्ये सदर वेतनश्रेणीवर परिगणना होऊन वेतनवाढ होणे आवश्यक होते. परंतु सन २०११ मध्ये दिलेलीच वेतनवाढ कायम ठेऊन दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. त्यामुळे परिशिष्टामध्ये दर्शविलेले कर्मचारी श्रीम. रेखा राजू घोरी यांस माहे जुलै २०१२ ते माहे फेब्रुवारी २०१३ पर्यंतची रक्कम रु.२५७०/- कमी वेतन दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. तरी या बाबत संबंधीत कर्मचाऱ्यास सदरची रक्कम अदा करण्यात यावी व अशी चूक पुन्हा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतनवाढ नोंदवही अद्ययावत करुन त्यावर मंजुरीचे आदेश घेण्यात यावेत व वरील सर्व बाबींची पूर्तता करुन तसे अनुपालन लेखापरिक्षणास सादर करावे.

५१. **श्रीम. रंजना महेंद्र पाटील यांच्या वेतनवाढीबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील आस्थापना विभागातील सेवा पुस्तकांची तपासणी करीत असता **परिशिष्ट क्र.२१ (पृष्ठ क्र.१६७)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे सन २०११-१२ वित्तीय वर्षामध्ये माहे जुलै २०११ मध्ये दिलेली वेतनवाढ सन जुलै २०१२ मध्ये पूर्ण होऊन जुलै २०१२ मध्ये सदर वेतनश्रेणीवर परिगणना होऊन वेतनवाढ होणे आवश्यक होते. परंतु सन २०११ मध्ये दिलेलीच वेतनवाढ कायम ठेऊन दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. त्यामुळे परिशिष्टामध्ये दर्शविलेले कर्मचारी श्रीम. रंजना महेंद्र पाटील यांस माहे जुलै २०१२ ते माहे फेब्रुवारी २०१३ पर्यंतची रक्कम रु.२५७०/- कमी वेतन दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. तरी या बाबत संबंधीत कर्मचाऱ्यास सदरची रक्कम अदा करण्यात यावी व अशी चूक पुन्हा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतनवाढ नोंदवही अद्ययावत करुन त्यावर मंजुरीचे आदेश घेण्यात यावेत व वरील सर्व बाबींची पूर्तता करुन तसे अनुपालन लेखापरिक्षणास सादर करावे.

५२. **श्री. संजय गोविंद पाकळे यांच्या वेतनवाढीबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील आस्थापना विभागातील सेवा पुस्तकांची तपासणी करीत असता **परिशिष्ट क्र.२२ (पृष्ठ क्र.१६८ ते १६९)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे श्री. संजय गोविंद पाकळे यांच्या महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २००९ अन्वये दि.०१/०१/२००६ पासून वेतन निश्चितीसाठी नमुना जोडपत्र क्र.१ मध्ये सादर केलेल्या वेतनवाढीच्या परिगणना केल्याच्या नोंदीचे लेखापरिक्षण केले असता रक्कम माहे जून २०११ ते माहे फेब्रुवारी २०१३ पर्यंतची रक्कम रु.१९९४८/- कमी वेतन दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. तरी या बाबत संबंधीत कर्मचाऱ्यास सदरची रक्कम अदा करण्यात यावी व अशी चूक पुन्हा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतनवाढ नोंदवही अद्ययावत करुन त्यावर मंजुरीचे आदेश घेण्यात यावेत व वरील सर्व बाबींची पूर्तता करुन तसे अनुपालन लेखापरिक्षणास सादर करावे.

५३. **श्री. दयानंद दिवान सरबटा यांच्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चितीच्या परिगणनेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील आस्थापना विभागातील सेवा पुस्तकांची तपासणी करीत असता **परिशिष्ट क्र.२३ (पृष्ठ क्र.१६९)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे श्री. दयानंद दिवान सरबटा यांस सहावा वेतन आयोगाच्या परिगणनेमध्ये माहे जुलै २०११ ते माहे मार्च २०१२ या कालावधीमध्ये वेतनश्रेणी चुकीची दिल्याने रक्कम रु.४५८९/- जादा वेतन दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. तरी या बाबत संबंधीत कर्मचाऱ्याकडून सदरची रक्कम वसूल करण्यात यावी व अशी चूक पुन्हा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतनवाढ नोंदवही अद्ययावत करुन त्यावर मंजुरीचे आदेश घेण्यात यावेत व वरील सर्व बाबींची पूर्तता करुन तसे अनुपालन लेखापरिक्षणास सादर करावे.

वसूलपात्र रक्कम रु.४५८९/-

५४. **श्री. विकास मनोहर जाधव यांच्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चितीच्या परिगणनेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील आस्थापना विभागातील सेवा पुस्तकांची तपासणी करीत असता **परिशिष्ट क्र.२४ (पृष्ठ क्र.१७०)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे श्री. विकास मनोहर जाधव यांच्या महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २००९ अन्वये दि.०१/०१/२००६ पासून वेतन निश्चितीसाठी नमुना जोडपत्र क्र.१ मध्ये सादर केलेल्या वेतनवाढीच्या परिगणना केल्याच्या नोंदीचे लेखापरिक्षण केले असता रक्कम माहे जून २०११ ते माहे मार्च २०१२ पर्यंतची रक्कम रु.१३७३७/- कमी वेतन दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. तरी या बाबत संबंधीत कर्मचाऱ्यास सदरची रक्कम अदा करण्यात यावी व अशी चूक पुन्हा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतनवाढ नोंदवही अद्ययावत करुन त्यावर मंजुरीचे आदेश घेण्यात यावेत व वरील सर्व बाबींची पूर्तता करुन तसे अनुपालन लेखापरिक्षणास सादर करावे.

५५. **श्री. प्रमोद यादव वर्तक यांच्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चितीच्या परिगणनेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील आस्थापना विभागातील सेवा पुस्तकांची तपासणी करीत असता **परिशिष्ट क्र.२५ (पृष्ठ क्र.१७१)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे श्री. प्रमोद यादव वर्तक यांच्या महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २००९ अन्वये दि.०१/०१/२००६ पासून वेतन निश्चितीसाठी नमुना जोडपत्र क्र.१ मध्ये सादर केलेल्या वेतनवाढीच्या परिगणना केल्याच्या नोंदीचे तसेच सेवा पुस्तक व कालबध्द पदोन्नतीच्या नस्तीची पडताळणी केली असता सदर कर्मचाऱ्यास कालबध्द पदोन्नती (आश्वासित प्रगती योजना) दिल्याचे दिसून येते. परंतु त्यांना त्यानुसार ग्रेड पे दिलेला दिसून येत नाही. यास्तव सदर कर्मचाऱ्यास माहे जून २०११ ते माहे मार्च २०१२ पर्यंतची रक्कम रु.१४६०/- कमी वेतन दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. तरी या बाबत संबंधीत कर्मचाऱ्यास सदरची रक्कम अदा करण्यात यावी व अशी चूक पुन्हा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतनवाढ नोंदवही अद्ययावत करुन त्यावर मंजुरीचे आदेश घेण्यात यावेत व वरील सर्व बाबींची पूर्तता करुन तसे अनुपालन लेखापरिक्षणास सादर करावे.

५६. **श्री. सदानंद पाटील यांच्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चितीच्या परिगणनेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील आस्थापना विभागातील सेवा पुस्तकांची तपासणी करीत असता **परिशिष्ट क्र.२६ (पृष्ठ क्र.१७२)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे श्री. सदानंद पाटील यांच्या महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २००९ अन्वये दि.०१/०१/२००६ पासून वेतन निश्चितीसाठी नमुना जोडपत्र क्र.१ मध्ये सादर केलेल्या वेतनवाढीच्या परिगणना केल्याच्या नोंदीचे लेखापरिक्षण केले असता रक्कम माहे जून २०११ ते माहे मार्च २०१२ पर्यंतची रक्कम रु.२४३२/- कमी वेतन दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. तरी या बाबत संबंधीत कर्मचाऱ्यास सदरची रक्कम अदा करण्यात यावी व अशी चूक पुन्हा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतनवाढ नोंदवही अद्ययावत करुन त्यावर मंजुरीचे आदेश घेण्यात यावेत व वरील सर्व बाबींची पूर्तता करुन तसे अनुपालन लेखापरिक्षणास सादर करावे.

५७. **दावा नोंदवही (नमुना नं.९०) बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालयाचे सन २०११-२०१२ या कालावधीतील लेखापरिक्षणात महानगरपालिकेच्या विरुध्द केलेल्या न्यायालयीन दाव्याची नोंदवही नमुना नं.९० ची पडताळणी केली असता नोंदवही अपूर्ण असल्याची आढळून आली आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ नियम क्र.१२१ अन्वये दाव्याची नोंदवही नमुना नं.९० मध्ये ठेवली आहे. परंतु त्यामधील काही रकाने अद्यावत करण्यात आले नाही. करिता सदर बाबतीत संबंधीत विभाग प्रमुखाने सदर नोंदवहीतील रिकामी रकान्यातील नोंदी अद्ययावत करुन प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेऊन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसई-विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती क अंतर्गत निर्मळ उपविभाग
दि.१ एप्रिल २०११ ते दि.३१ मार्च २०१२ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवाल

१. **सर्वसाधारण जमा खर्चा बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत येणा-या निर्मळ उपविभागीय कार्यालयातील सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षातील जमाखर्चाच्या तपशिलाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

सर्वसाधारण जमा व खर्च **परिशिष्ट क्र. १ (पृष्ठ क्र.१७३)** मध्ये दिला आहे. दि.३१/०३/२०१२ अखेर सदर जमाखर्चामध्ये सुरुवातीच्या शिलकेसह रक्कम रुपये ४९९२५६.४५/- प्रत्यक्ष जमा असून अखेर शिल्लक रक्कम रुपये २६३२७६.४५/- आहे. जमाखर्चामध्ये दर्शविलेल्या लेखा शिर्षानुसार जमा झालेल्या रकमेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.५१ नुसार प्रत्येक महिन्याअखेर नोंदवहीत नोंदविलेल्या जमाखर्चाच्या पासबुकातील नोंदीबरोबर तुलना करुन शिलकेची जुळणी करुन जर काही फरक असेल तर रोकडवही तळटीपेत स्पष्टीकरण देऊन रोकडवहीमध्ये नोंद करणे आवश्यक आहे.
२. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१८७ नुसार नमुना क्र.१४२ मध्ये बँकेत गुंतवणूक केलेल्या निधीची नोंद नोंदवहीमध्ये करणे आवश्यक आहे.
३. रोकडवहीमध्ये जमा होणा-या रकमेची नोंद नमुना क्र.२४ मध्ये नोंद करुन सदर नोंदवहीमधील रकमेचा रोकडवहीशी ताळमेळ घेणे आवश्यक आहे.
४. शिल्लक रक्कम मनपा मुख्य खात्यात त्वरीत वर्ग करणे आवश्यक आहे.

उपरोक्त १ ते ४ बाबींची पूर्तता करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

२. **बँक ताळमेळ पत्रक:-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत निर्मळ उपविभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय कालावधीतील लेखा परीक्षणात रोखवहीत दर्शविण्यात आलेली रक्कम बँकेमध्ये शिल्लक असलेल्या रकमेशी पडताळणी करीत असता विवरणपत्रामध्ये दर्शविलेली रक्कम त्यामध्ये खालीलप्रमाणे तफावत आहे.

अ.क्र.	खात्याचे नांव	खाते क्र.	रोकडवहीनुसार शिल्लक	पासबुकानुसार शिल्लक	तफावत	शेरा
१	पोष्ट		२८/१०	०	०	पासबुक उपलब्ध नाही
२	दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक वाघोली शाखा	००/८३	११७९९५.८८	६५६४५.४४	५२३५०.४४	--
३	बॅक ऑफ महाराष्ट्र	५९७	५८९.८९	-	-	पासबुक उपलब्ध नाही
४	दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक वसई शाखा	६५२	११६५.५८	-	-	पासबुक उपलब्ध नाही
५	दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक मुदतठेव गुंतवणूक		३००८२.००	३००८३.००	-	

६	दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक नळपाणीपट्टी खाते	१०७७	३९९७६.००	३५६८०.००	४२९६.००	--
					५६६४६.४४	

सबब रोखवहीप्रमाणे बँकेत दर्शविलेली शिल्लक रक्कम व बँकेच्या विवरणामधील शिल्लक रक्कम यामध्ये असलेली रक्कम रु.५६६४६.४४/- या तफावतीचा ताळमेळ घेऊन तफावत दूर करावी व पासबुक उपलब्ध करुन लेखापरिक्षणास दाखवावे.

वरीलप्रमाणे पूर्तता करुन अनुपालन लेखा परीक्षणास सादर करावे.

३. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमे बाबत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत निर्मळ उपविभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२ (पृष्ठ क्र.१७३)** मध्ये दर्शविलेली एकत्रित मालमत्ता कराची रक्कम रुपये ९००२५४/- थकीत आहे.

मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापी त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम रुपये ९००२५४/- व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर एकत्रित मालमत्ता कर थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही? याचा खुलासा करावा करिता सदर थकबाकी वसूली बाबत ठोस कार्यवाही करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये ९००२५४/-

४. **पाणीपट्टी कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत निर्मळ उपविभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील पाणीपट्टी करविभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.३ (पृष्ठ क्र.१७३)** मध्ये दर्शविलेल्या पाणीपट्टी थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये ४२७४११/- थकीत आहे.

मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापी त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही . तरी थकीत रक्कम रुपये ४२७४११/- व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर पाणीपट्टी थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच पाणीपट्टी थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही? याचा खुलासा करावा. करिता सदर थकबाकी वसूली बाबत ठोस कार्यवाही करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये ४२७४११/-

५. **गाळा भुई भाडे कराच्या वसुली बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत निर्मळ उपविभागाचे सन २०११-१२ या वित्तीय कालावधीतील सामान्य विभागातील भुई भाडे कराच्या नोंदवहीचे लेखा परीक्षण केले असता **परिशिष्ट क्र.४(पृष्ठ क्र.१७३)** मध्ये दर्शविलेली रक्कम रुपये १५१५७१/- थकीत असल्याचे आढळून आले आहे. करिता सदरची थकीत रक्कम रु.१५१५७१/- मात्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची प्रकरण ८ मधील नियम क्रमांक ४२ अन्वये व्याजासह वसूल करुन महानगरपालिका निधीत जमा केल्याचे, तसेच मागणी नोंदवहीवर प्राधिकृत अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेऊन लेखा परीक्षणास अनुपालन करावे.

वसूल पात्र रक्कम रु. १५१५७१/-

६. **कर निर्धारण सूचीच्या मागणी व एकत्रित कराच्या मागणी मध्ये असलेल्या तफावतीबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत निर्मळ उपविभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाच्या मागणी नोंदवहीचे लेख्यांची तपासणी केली असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिंता १९७१ मधील नियम ७५ व ७६ च्या १ ते ४ अन्वये कर निर्धारण सुचीमध्ये दर्शविलेली मागणी व मागणी नोंदवही मध्ये दर्शविलेली मागणी यामध्ये कमी रक्कम रु.९७०/- ओढल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. सोबत **परिशिष्ट क्र.५ (पृष्ठ क्र.१७४)** जोडले आहे. सदर कमी ओढलेली रक्कम रु.९७०/- संबंधितांकडून वसूल करुन व या झालेल्या अनियमिततेबाबत संबंधित सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रु. ९७०/-

७. **भविष्य निर्वाह निधिचे लेखे बाबत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत निर्मळ उपविभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील वेतन देयक नोंदवहीचे लेखापरिक्षण करित असताना वेतन देयकामध्ये वजा करण्यात आलेल्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम १३४ चे (१)(३)(५) नुसार नोंदवहीत नोंदी न केल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. ह्या बाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१. वेतन नोंदवहीमध्ये वजा करण्यात आलेल्या भविष्य निर्वाहनिधी रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करुन सदर जमेची नोंद भविष्य निर्वाह निधी रोकडवही नमुना क्र.१०० मध्ये दर्शविणे आवश्यक आहे.
२. भविष्य निर्वाह निधी वर्गणीसाठी नमुना क्र.९८ प्रमाणे खातेवही व नमुना क्र.९९ प्रमाणे वसुली नोंदवही ठेवण्यात यावी. तसेच शासनाने मंजूर केलेल्या व्याजाच्या दरानुसार परिगणना करुन त्याचा ताळमेळ घेऊन लेखे अद्ययावत करणे आवश्यक आहे.
३. वित्तीय वर्षाअखेर वर्गणीदारास वर्षभरात व्याजासहित जमा झालेल्या रक्कमेच्या विवरणपत्राची अचूकतेची पडताळणी करुन संबंधित प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी घेऊन वर्गणीदारास नोंदीची प्रत देणे आवश्यक आहे.
४. महाराष्ट्र शासन वित्त विभाग दि.३१/१०/२००५ च्या अधिसूचनेनुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आलेले आहे. सदर योजनेअंतर्गत ज्या कर्मचा-याची नेमणूक दि.०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-याच्या त्याच्या मूळ वेतन अधिक महागाई भत्ता या रकमेच्या १० टक्के इतके मासिक अंशदान द्यावे लागेल व ही रक्कम प्रत्येक महिन्यात कर्मचारी वेतन देयकातून वजा करुन तसेच राज्य शासनाच्या अखत्यारित असलेल्या स्थानिक संस्थेकडून समतुल्य अंशदान वजा करुन सदरची रक्कम परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन खात्यामध्ये वर्ग करणे आवश्यक आहे.

   उपरोक्त १ ते ४ बाबींची पूर्तता करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

८. **कर निर्धारण नोंदवही व मागणी नोंदवही बाबत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत येणा-या निर्मळ उपविभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर विभागाचे लेखा परिक्षण करित असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ च्या नियम क्र.७४ व ७५ अन्वये कर निर्धारण नोंद वही नमुना क्र.४३ मध्ये व नियम क्र.७६ अन्वये मागणी नोंदवही नमुना क्र.४७ मध्ये नोंदवह्या ठेवल्याचे आढळून आले आहे. ह्याबाबतीत पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

१. कर निर्धारण नोंदवहीतील प्रत्येक पानावर नोंदविलेल्या आकारणी मागणीच्या बेरजा घेऊन एकूण वर्षाची मागणी कायम करणे आवश्यक असताना अशाप्रकारची एकूण आकारणी मागणी कायम न केल्याचे आढळून आले आहे.
२. कर निर्धारण नोंदवहीतील वाढ व घट नोंद न केल्याचे दिसून येत आहे.
३. मागणी नोंदवहीच्या प्रत्येक पानावर बेरजा घेऊन त्या वर्षात जमा झालेल्या वसुली रकमेचा व थकबाकी रकमेचा मेळ घेऊन गोषवारा काढण्यात आलेला नाही.
४. आकारणी व चालू मागणीचा मेळ घेतलेला नाही.

वरील १ ते ४ बाबींची पूर्तता करुन व त्यावर प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी घेऊन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसई-विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती क अंतर्गत भुईगांव खुर्द उपविभाग
दि. १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवाल

१. **सर्वसाधारण जमा खर्चा बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत येणा-या भुईगांव खुर्द उपविभागीय कार्यालयातील सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षातील जमाखर्चाच्या तपशिलाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

सर्वसाधारण जमा व खर्च **परिशिष्ट क्रमांक १(पृष्ठ क्र.१७४)** मध्ये दिला आहे. दि.३१/०३/२०१२ अखेर सदर जमाखर्चामध्ये सुरुवातीच्या शिलकेसह रक्कम रुपये २०९१३९/- प्रत्यक्ष जमा असून अखेर शिल्लक रक्कम रुपये १४९१३९/- आहे. जमाखर्चामध्ये दर्शविलेल्या लेखा शिर्षानुसार जमा झालेल्या रकमेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.५१ नुसार प्रत्येक महिन्याअखेर नोंदवहीत नोंदविलेल्या जमाखर्चाच्या पासबुकातील नोंदीबरोबर तुलना करुन शिलकेची जुळणी करुन जर काही फरक असेल तर रोकडवही तळटीपेत स्पष्टीकरण देऊन रोकडवहीमध्ये नोंद करणे आवश्यक आहे.
२. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१८७ नुसार नमुना क्र.१४२ मध्ये बँकेत गुंतवणूक केलेल्या निधीची नोंद नोंदवहीमध्ये करणे आवश्यक आहे.

३. रोकडवहीमध्ये जमा होणा-या रकमेची नमुना क्र.२४ मध्ये नोंद करुन सदर नोंदवहीमधील रकमेचा रोकडवहीशी ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

४. शिल्लक रक्कम मनपा मुख्य खात्यात त्वरीत वर्ग करणे आवश्यक आहे.

परंतु वरीलप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. तरी उपरोक्त १ ते ४ बाबींची पूर्तता करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

२. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत भुईगांव खुर्द उपविभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२(पृष्ठ क्र.१७४)** मध्ये दर्शविलेली एकत्रित मालमत्ता कराची रक्कम रुपये ९१९७१३/- थकीत आहे.

मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापी त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही . तरी थकीत रक्कम रुपये ९१९७१३/- व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर एकत्रित मालमत्ता कर थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही? याचा खुलासा करावा करिता सदर थकबाकी वसूली बाबत ठोस कार्यवाही करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये ९१९७१३/-

३. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाक्या पुढील वर्षाच्या मागणी नोंदवहीत न ओढल्याबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत भुईगांव खुर्द उपविभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाच्या मागणी नोंदवहीचे लेख्यांची तपासणी केली असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिंता १९७१ मधील नियम ७६ (२) मध्ये नमुद केल्यानुसार सन २०१०-११ अखेरच्या थकबाक्या सन २०११-१२ च्या मागणी नोंदवहीत कमी ओढल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. सोबत **परिशिष्ट क्र. ३ (पृष्ठ क्र.१७४)** जोडले आहे. कमी ओढलेली रक्कम रु. ७८६१/- इतकी आहे. सदरची सन २०१०-११ अखेरची थकबाकीची रक्कम कमी ओढल्याने ती कायम स्वरुपी लेख्यातून बाहेर जाण्याची शक्यता आहे. तेव्हा सदर सन २०१०-११ अखेरच्या थकबाकीच्या रक्कमा मागणी नोंद वहीत न ओढल्याबाबत खुलासा करुन त्या रकमा खातेदाराच्या मागणी नोंदवहीत नोंदी घेऊन त्यांच्याकडून वसूलीची कार्यवाही करावी. उपरोक्त अनियमीतता उदाहरणे दाखल देण्यात आले असून त्याचा तपशिल सोबत जोडलेल्या विवरणपत्रकात देण्यात आलेला आहे. उर्वरीत मागणी नोंदवहीतील थकबाकी धारकाच्या थकबाक्या पुढील वर्षात ओढल्या व कसे याबाबतची खात्री करुन मेळ घेण्यात यावा. तसेच या वर्षाची व मागील वर्षाची मागणी नोंदवही यातून मागणी विषयक नोंदी अचूकपणे पुढे ओढण्यात आल्या आहेत का? याबाबत खात्रीकरुन तत्कालीन सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने तसे प्रमाणित करणे आवश्यक असताना मागणी नोंदवही प्रमाणित केली नसल्याचे आढळून आले आहे. तरी या बाबत खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रु. ७८६१/-

४. **भविष्य निर्वाह निधिचे लेखे बाबत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत भुईगांव खुर्द उपविभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामधील वेतन देयक नोंदवहीचे लेखापरिक्षण करित असताना वेतन देयकामध्ये वजा करण्यात आलेल्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम १३४ चे (१)(३)(५) नुसार नोंदवहीत नोंदी न केल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. ह्या बाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१. वेतन नोंदवहीमध्ये वजा करण्यात आलेल्या भविष्य निर्वाहनिधी रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करुन सदर जमेची नोंद भविष्य निर्वाह निधी रोकडवही नमुना क्र.१०० मध्ये दर्शविणे आवश्यक आहे.

२. भविष्य निर्वाह निधी वर्गणीसाठी नमुना क्र.९८ प्रमाणे खातेवही व नमुना क्र.९९ प्रमाणे वसुली नोंदवही ठेवण्यात यावी. तसेच शासनाने मंजूर केलेल्या व्याजाच्या दरानुसार परिगणना करुन त्याचा ताळमेळ घेऊन लेखे अद्ययावत करणे आवश्यक आहे.

३. वित्तीय वर्षाअखेर वर्गणीदारास वर्षभरात व्याजासहित जमा झालेल्या रक्कमेच्या विवरणपत्राची अचूकतेची पडताळणी करुन संबंधित प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी घेऊन वर्गणीदारास नोंदीची प्रत देणे आवश्यक आहे.

४. महाराष्ट्र शासन वित्त विभाग दि.३१/१०/२००५ च्या अधिसूचनेनुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आलेले आहे. सदर योजनेअंतर्गत ज्या कर्मचा-याची नेमणूक दि.०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-याच्या त्याच्या मूळ वेतन अधिक महागाई भत्ता या रकमेच्या १० टक्के इतके मासिक अंशदान द्यावे लागेल व ही रक्कम प्रत्येक महिन्यात कर्मचारी वेतन देयकातून वजा करुन तसेच राज्य शासनाच्या अखत्यारित

असलेल्या स्थानिक संस्थेकडून समतुल्य अंशदान वजा करुन सदरची रक्कम परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन खात्यामध्ये वर्ग करणे आवश्यक आहे.

उपरोक्त १ ते ४ बाबींची पूर्तता करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

५. **कर निर्धारण नोंदवही व मागणी नोंदवही बाबत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत येणा-या भुईगांव खुर्द उपविभागीय कार्यालयाचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर विभागाचे लेखा परिक्षण करित असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ च्या नियम क्र.७४ व ७५ अन्वये कर निर्धारण नोंद वही नमुना क्र.४३ मध्ये व नियम क्र.७६ अन्वये मागणी नोंदवही नमुना क्र.४७ मध्ये नोंदवह्या ठेवल्याचे आढळून आले आहे. ह्याबाबतीत पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

१. कर निर्धारण नोंदवहीतील प्रत्येक पानावर नोंदविलेल्या आकारणी मागणीच्या बेरजा घेऊन एकूण वर्षाची मागणी कायम करणे आवश्यक असताना अशाप्रकारची एकूण आकारणी मागणी कायम न केल्याचे आढळून आले आहे.
२. कर निर्धारण नोंदवहीतील वाढ व घट नोंद न केल्याचे दिसून येत आहे.
३. मागणी नोंदवहीच्या प्रत्येक पानावर बेरजा घेऊन त्या वर्षात जमा झालेल्या वसुली रकमेचा व थकबाकी रकमेचा मेळ घेऊन गोषवारा काढण्यात आलेला नाही.
४. आकारणी व चालू मागणीचा मेळ घेतलेला नाही.

वरील १ ते ४ बाबींची पूर्तता करुन व त्यावर प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी घेऊन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसई-विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती क अंतर्गत गास उपविभाग
दि. १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवाल

१. **सर्वसाधारण जमा खर्चा बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा विभागीय कार्यालय अंतर्गत येणा-या गास उपविभागीय कार्यालयातील सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षातील जमाखर्चाच्या तपशिलाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

सर्वसाधारण जमा व खर्च **परिशिष्ट क्रमांक १ (पृष्ठ क्र.१७५)** मध्ये दिला आहे. दि.३१/०३/२०१२ अखेर सदर जमाखर्चामध्ये सुरुवातीच्या शिलकेसह रक्कम रुपये २४२९४१४.९७/- प्रत्यक्ष जमा असून अखेर शिल्लक रक्कम रुपये १२४९७४२.९७/- आहे. जमाखर्चामध्ये दर्शविलेल्या लेखा शिर्षानुसार जमा झालेल्या रकमेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.५१ नुसार प्रत्येक महिन्याअखेर नोंदवहीत नोंदविलेल्या जमाखर्चाच्या पासबुकातील नोंदीबरोबर तुलना करुन शिलकेची जुळणी करुन जर काही फरक असेल तर रोकडवही तळटीपेत स्पष्टीकरण देऊन रोकडवहीमध्ये नोंद करणे आवश्यक आहे.
२. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१८७ नुसार नमुना क्र.१४२ मध्ये बँकेत गुंतवणूक केलेल्या निधीची नोंद नोंदवहीमध्ये करणे आवश्यक आहे.
३. रोकडवहीमध्ये जमा होणा-या रकमेची नमुना क्र.२४ मध्ये नोंद करुन सदर नोंदवहीमधील रकमेचा रोकडवहीशी ताळमेळ घेणे आवश्यक आहे.
४. शिल्लक रक्कम मनपा मुख्य खात्यात त्वरीत वर्ग करणे आवश्यक आहे.

उपरोक्त १ ते ४ बाबींची पूर्तता करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

२. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

